## थोडक्यात...

### वडाळा येथे ६.२१ लाखांचा गांजा जप्त

**(दिनेश मराठे /दै.धर्मयोध्दा)**

**मुंबई -** अंमली पदार्थ विरोधी पथकाने वडाळा परिसरात कारवाई करत तब्बल २० किलो ७०० ग्रॅम गांजा जप्त केला असून या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. मोहमद फारूख मोहम्मद हारून खान (वय ३२, व्यवसाय इलेक्ट्रिशियन, रा. चांदनी आगार, प्रेम गल्ली, एस.पी. रोड, संगम नगर पोलीस चौकीजवळ, अँटॉप हिल, वडाळा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवडीचेंबूर रोडवरील पोल क्र. डब्ल्यू.टी.टी/०३, आणिक नगर बस डेपो मेट्रो स्टेशनजवळ, वडाळा टी.टी. परिसरात २ एप्रिल रोजी रात्री सुमारे १०.४० वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत आरोपीकडून २० किलो ७०० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून त्याची अंदाजे किंमत ६ लाख २१ हजार रुपये इतकी आहे. तसेच आरोपीकडील सुझुकी बर्गमन दुचाकी (क्र.एमएच -०१-इयु-९१९४) अंदाजे १ लाख रुपये किमतीची वाहनासह मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी एनडीपीएस ॲक्ट १९८५ च्या कलम ८ (सी) सह २० (बी)(सी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात 'अतिक' नावाचा एक इसम फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. याप्रकरणी अंमली पदार्थ विरोधी कक्ष, आझाद मैदान युनिटचे पोलीस हवालदार आघाव यांनी फिर्याद दिली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सागर ताले हे पोलीस निरीक्षक शैलेश सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करत आहेत.


### हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत बसस्थानकाचे सर्वेक्षण




**(गणेश जत्ती / दै.धर्मयोध्दा)**

**पाथरी-** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत पाथरी येथील बसस्थानकाचे चौथे सर्वेक्षण यशस्वीरीत्या पार पडले. या सर्वेक्षणाद्वारे बसस्थानकाच्या स्वच्छता, सुविधा व व्यवस्थापनाची पाहणी करण्यात आली. या सर्वेक्षणासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या लातूर विभागाचे विभाग नियंत्रक शेडे यांनी मूल्यांकन समितीचे प्रमुख म्हणून उपस्थिती दर्शवली. तसेच विभाग नीयंत्रक विलास राठोड , विभागीय कार्यालयीन अधिकारी प्रविण राठोड यांचीही प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पाथरी आगाराचे आगार व्यवस्थापक हणमंत चपटे, स्थानक प्रमुख येडले, कर्मचारी प्रतिनिधी सुनिल तळेकर तसेच प्रवासी मित्र आणि इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वेक्षणादरम्यान बसस्थानक परिसरातील स्वच्छता, प्रवाशांसाठी उपलब्ध सुविधा, तिकीट व्यवस्था, पाणी व शौचालयांची स्थिती यांची सखोल पाहणी करण्यात आली. तसेच अधिक सुधारणा करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

# "भाजपात महाभूकंप! ११ नगरसेवकांचा बंडखोर मोर्चा, जिल्हाध्यक्षांची थेट 'बडतर्फी'ची मागणी माजी महापौरांनाही फटका?"





**परभणी -** महानगर पालिकेतील भाजपाच्या अंतर्गत राजकारणाने आता उग्र वळण घेतले असून, पक्षात अक्षरशः महाभूकंप झाला आहे. एकीकडे भाजपच्या तब्बल ११ नगरसेवकांनी गटनेता बदलण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालय, प्रदेशाध्यक्ष तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत जोरदार लॉबिंग केल्याची माहिती समोर आली आहे. तर दुसरीकडे या घडामोडींना प्रत्युत्तर म्हणून महानगर जिल्हाध्यक्षांनी थेट बंडखोरांवर बडतर्फीची कारवाई करण्याची मागणी केल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. महानगरपालिकेतील एकूण १२ भाजप सदस्यांपैकी तब्बल ११ सदस्यांनी विद्यमान गटनेतृत्वावर अविश्वास दाखवत बदलाची जोरदार मागणी केली. या सामूहिक भूमिकेमुळे पक्षात मोठी फूट उघड झाल्याचे स्पष्ट झाले आहे. गटनेता बदलण्यासाठी थेट उच्चस्तरीय पातळीवर धाव घेण्यात आल्याने हा वाद आता स्थानिक पातळीपलीकडे जाऊन राज्य पातळीवर पोहोचला आहे. दरम्यान, या सर्व पार्श्वभूमीवर जिल्हाध्यक्षांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेत, पक्षशिस्त मोडणाऱ्या सर्व संबंधित नगरसेवकांवर कडक कारवाई करून त्यांना तात्काळ बडतर्फ करण्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे, या प्रस्तावित कारवाईत माजी मंत्री यांच्या सौभाग्यवती आणि परभणीच्या माजी महापौर मीनाताई सुरेशराव वरपूडकर यांचाही समावेश असल्याने प्रकरण अधिकच गाजत आहे. जिल्हाध्यक्षांच्या या भूमिकेमुळे भाजपात दोन गटांमध्ये उघड संघर्ष पेटल्याचे दिसून येत आहे. एका बाजूला गटनेता बदलासाठी एकवटलेले ११ नगरसेवक, तर दुसऱ्या बाजूला पक्षशिस्तीचा धागा घट्ट पकडून कठोर कारवाईची मागणी करणारे जिल्हाध्यक्ष या संघर्षामुळे पक्षाच्या संघटनात्मक ऐक्यावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता या साऱ्या घडामोडींवर भाजपा प्रदेशाध्यक्ष आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नेमकी कोणती भूमिका घेणार, बंडखोर नगरसेवकांवर खरोखरच बडतर्फीची कारवाई होणार का, याकडे संपूर्ण परभणी जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे

**तक्रार दिलेले पदाधिकारी व नगरसेवकांची यादी**

१) श्री. प्रमोद वाकोडकर (उद्योग आघाडी प्रदेशाध्यक्ष)
२) विश्वजीत मनोहर बुधवंत (श्रीरामनगर, परभणी)
३) गणेश नंदकुमार टाक (लोकमान्य नगर, परभणी)
४) गिरीजा शंकरराव आजेगांवकर (संत दासगणू नगर, परभणी)
५) मिना सुरेशराव वरपुडकर (विष्णू नगर, परभणी)
६) रितेश कांतीलाल झांबड (जैन) (लोकमान्य नगर, परभणी)
७) डॉ. केदार लक्ष्मणराव खटिंग (विष्णू नगर, परभणी)

## दिव्यांगांच्या मागण्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष; १५ एप्रिलला 'भिक मागो आंदोलन'चा इशारा

**(गणेश जत्ती /दै.धर्मयोध्दा)**

**पाथरी -** परभणी जिल्ह्यातील दिव्यांगांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाने वारंवार दुर्लक्ष केल्याचा आरोप करत दिव्यांग संघर्ष समिती, महाराष्ट्र (शाखा परभणी) यांच्या वतीने तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. यासंदर्भात उपजिल्हाधिकारी, पाथरी यांना सविस्तर निवेदन देण्यात आले आहे. समितीचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद अल्ताफ मोहम्मद आसिफ यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, शासनाच्या विविध योजनांचा लाभ दिव्यांगांपर्यंत प्रत्यक्षात पोहोचत नसून त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. यापूर्वी दि. १९ जानेवारी २०२४, ४ मार्च २०२५, १४ ऑक्टोबर २०२५, तसेच ३ जानेवारी २०२६ रोजीही निवेदन देऊन मागण्यांकडे लक्ष वेधण्यात आले होते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे त्यांनी सांगितले.




समितीने आपल्या निवेदनात खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत:

दिव्यांगांसाठी नगरपालिकेच्या निधीपैकी किमान ५ टक्के निधी राखीव ठेवावा

दिव्यांगांचीघरपट्टीवनळपट्टीपूर्णपणेमाफकरावी

नगर परिषद हद्दीत दिव्यांगांना २०० चौ. मीटरचे गाळे उपलब्ध करून द्यावेत

दिव्यांगांना कोणत्याही अटींशिवाय घरकुल योजना उपलब्ध करून द्यावी

या मागण्यांसाठी यापूर्वी उपोषणाचा इशाराही देण्यात आला होता. दि. ३ जानेवारी २०२६ रोजी उपोषणासाठी अर्ज सादर करूनही प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, प्रशासनाने तातडीने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय न घेतल्यास दि. १५ एप्रिल २०२६ रोजी पाथरी येथील पोस्ट ऑफिस चौक ते उपजिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत 'भिक मागो आंदोलन' करण्यात येईल, असा इशारा समितीने दिला आहे. या आंदोलनादरम्यान उद्भवणाऱ्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. हे निवेदन मुख्याधिकारी, नगर परिषद पाथरी, तहसीलदार, पाथरी तसेच पोलीस निरीक्षक, पाथरी यांना देण्यात आल्या आहेत.निवेदन देताना मोहम्मद अल्ताफ ,नितिनकुमार वैराळे ,मनोज कुमार माने ,सुनिल (काका) तळेकर ,प्रशांत पामे ,मनोज केदारे ,शेख नदिम ,शेख निसार ,रामप्रभु टोके ,आसिफ युनूस बागवान ,सुरैय्या शेख ईब्राईम ,महमुद गफार ,मोहम्मद ईल्यास व ईतर दिव्यांग बांधव ऊपस्थीत होते .

## सिरसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष डॉ.जे.एन.शेख यांचे दुःखद निधन



**(बालासाहेब काळे / दै.धर्मयोध्दा)**

**सिरसाळा -** पोहनेर येथील वतनदार बागवान कुटुंबातील पत्रकार डॉ.जे.एन. शेख हे गरीब परिस्थितीतुन पुढेत त्यांनी आपल्या किल्निकच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांना सेवा देत. त्यांनी विविध दैनिकांसाठी सिरसाळा प्रतिनिधी म्हणून त्यांनी पत्रकारीतेच्या माध्यमातून नावलौकिक मिळविला. तसेच सामाजिक व राजकीय घडामोडीत देखील त्यांचा सहभाग असायचा.आश्या या हरहुन्नरी पत्रकारच निधनाने हळहळ व्यक्त केली जात आहे.त्यांचे निधन अल्पशा आजाराने झाले.त्यांच्या पश्चात पत्नी,भाऊ,मुले,सुनां,नातरुंड इत्यादी परीवार आहे.परमेश्वर शेख कुटुंबातील सर्वांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो.दै.धर्मयोध्दा परीवार शेख कुटुंबातील दुःखात सहभागी आहे.

## वंचित बहुजन आघाडी आक्रमक; गॅस पुरवठा सुरळीत करण्याची मागणी; राजू कांबळे यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन संपन्न

**(ज्ञानेश्वर गिरी /दै.धर्मयोध्दा)**

**कळमनुरी -** तालुक्यात वाढत्या गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने "नरेंद्र कब मिलेगा सिलेंडर" या राज्यव्यापी आंदोलनांतर्गत तहसील कार्यालयासमोर जोरदार धरणे आंदोलन करण्यात आले. सर्वसामान्य नागरिकांना गॅस सिलेंडरसाठी तासन्□तास रांगेत उभे राहावे लागत असल्याने जनतेत तीव्र संताप व्यक्त होत आहे. या आंदोलनादरम्यान केंद्र सरकारचे पंतप्रधान यांच्या धोरणांवर टीका करत, गॅस पुरवठा नियमित करण्याची जोरदार मागणी करण्यात आली. नागरिकांना वेळेवर गॅस मिळत नसल्याने घरगुती जीवन विस्कळीत झाले असून, महिलांना विशेषतः मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे, असे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. आंदोलनाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे आंदोलनकर्त्यांनी पारंपरिक पद्धतीने चुलीवर भाकर बनवून आपला निषेध



व्यक्त केला. तयार केलेली भाकर आणि कांदा तहसीलदारांना देत "गॅस नसेल तर आम्हाला पुन्हा चुलीवर यावे लागत आहे", असा संदेश प्रशासनाला देण्यात आला. यासोबतच विविध मागण्यांचे निवेदनही तहसील प्रशासनाला सादर करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष राजू कांबळे यांनी केले. हिंगोली जिल्ह्यात अन्याय आणि अत्याचाराविरोधात सातत्याने आवाज उठवणारे, कायदा आणि राजकारणाचा अभ्यासू दृष्टीकोन असलेले युवा नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. गोरगरिबांच्या प्रश्नांसाठी ते नेहमीच आघाडीवर राहून लढा देत असल्याचे कार्यकर्त्यांनी नमूद केले. यावेळी बाबारावजी थोरात, विनोददादा थोरात, मोहम्मद असलम (युवा तालुका अध्यक्ष), संतोष इंगोले, दिनेश पाईकराव, जयभीम डोंगरे, प्रश्नात चोपडे, राष्ट्रपाल कोकरे, शिवाजी भुतणर, अमोल खंदारे, धम्मपाल पाईकराव, करण नरवाडे, दादाराव खंदारे, भगवान ढेपे, शकील पठाण, काशिनाथ साळवे, प्रबुद्ध पाईकराव, विजय जोंधळे, बापुराव महाजन, शेख कलीम, नथुराम खंदारे, सोनबाराव कोकरे, विशाल महाजन, जितेश कदम, अमोल पुंडगे, समाधान पाईकराव, दिनेश वाढवे, गोविंद पाईकराव, कानबाराव लाखाडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आंदोलनामुळे कळमनुरी तालुक्यातील गॅस टंचाईचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन गॅस पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने देण्यात आला आहे.

## जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालयाची मागणी; पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांना शिष्टमंडळ भेटणार

**(बाळासाहेब मस्के / दै.धर्मयोध्दा)**

**चारठाणा -**जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याची मागणी पुन्हा एकदा ऐरणीवर आली असून, भाजप नेते नानासाहेब राऊत यांनी या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेतली आहे. या मागणीसाठी लवकरच शिष्टमंडळाच्या माध्यमातून पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांची भेट घेऊन, जिल्हाधिकारी निवेदन देणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. चारठाणा हे तालुक्यातील मध्यवर्ती ठिकाण असल्याने परिसरातील अनेक गावांतील नागरिकांना शासकीय कामांसाठी जिंतूर येथे जावे लागते. जमीन नोंदी, उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्रे तसेच इतर प्रशासकीय कामांसाठी वारंवार प्रवास करावा लागत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः शेतकरी, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना याचा अधिक फटका बसत आहे. याच पार्श्वभूमीवर नानासाहेब राऊत यांनी चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्याची मागणी जोरदारपणे लावून धरली आहे. "चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू झाल्यास नागरिकांचा वेळ व पैसा वाचेल आणि प्रशासनही अधिक प्रभावीपणे कार्य करू शकेल," असे त्यांनी सांगितले. दरम्यान, या मागणीसाठी लवकरच स्थानिक नागरिक व पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर करणार आहे. प्रशासनाने या मागणीची दखल घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



चारठाणा हे जिंतूर तालुक्यातील मध्यवर्ती व ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे ठिकाण असूनही येथे अप्पर तहसील कार्यालय न देणे हा सरळसरळ अन्याय आहे. परिसरातील २५ ते ३० गावांचे चारठाणा हे मध्यवर्ती ठिकाण आहे.या परिसरातील नागरिकांना शासकीय कामांसाठी जिंतूर येथे जावे लागते, ज्यामुळे त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम मोठ्या प्रमाणात काढण्यासाठी जिंतूर येथे जावे लागते., "शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. शासनाने ग्रामीण भागातील नागरिकांच्या सोयीचा विचार करून प्रशासनिक सुविधा त्यांच्या जवळ उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. मात्र चारठाणा बाबतीत हा विचार झालेला दिसत नाही, ही दुर्दैवी बाब आहे. या साठी लोकशाही मार्गाने आंदोलन ही करण्याची येईल"

**–भाजपा नेते नानासाहेब राऊत**

## एन. बी. तायनाक यांचा सेवा निवृत्ती गौरव समारंभ

**(गणेश जत्ती / दै.धर्मयोध्दा)**

**पाथरी -** पाथरी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ मानवत संचलित कै.स.गो.नखाते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय देवनांद्रा येथील पर्यवेक्षक एन .बी .तायनाक यांना संस्थेमध्ये सेवेला ३० वर्ष दोन महिने पुर्ण झाल्याने दि. ३० मार्च रोजी ते सेवानिवृत्त झाले. त्या निमित्ताने संस्थेच्या वतीने त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.संस्थेमध्ये ०१फेब्रुवारी १९९६ रोजी संस्थापक अध्यक्ष कै.स.गो.नखाते यांच्या व ईतर संचालक समोर प्रत्यक्ष मुलाखत देऊन नियुक्ती करण्यात आली होती , त्यांनी संस्थेच्या मानवत येथील श्रीमती शकुंतलाबाई कांचनराव कत्रुवार विद्यालय येथे व नंतर पाथरी येथील कै. स.गो. नखाते माध्यमिक व उच्च




माध्यमिक विद्यालय देवनांद्रा येथे विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याच्या कार्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या बौद्धिक ,आत्मिक, शारीरिक, सांस्कृतिक, मानसिक , शिस्त, सर्वांगीण विकास ,करण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली, शालेय परिसरातील वृक्षांची ,वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे या उक्तीप्रमाणे सर्व वृक्षाचे संगोपन केले आजच्या परिस्थितीमध्ये सर्व परिसर हिरवा असणे याचे श्रेय तायनाक यानांच जाते. जून २०२३ रोजी त्यांची उत्कृष्ट दूरदृष्टी लक्षात घेऊन संस्थेने पर्यवेक्षक पदी नियुक्ती केले, या काळामध्ये शाळेच्या सर्व कामकाजामध्ये व शालेय व्यवस्थापनामध्ये चांगली दृष्टी ठेवून सरांनी कार्य केले व ३१ मार्च २०२६ रोजी सरांना नियत वयोमानानुसार ३१ वर्ष दोन महिने पूर्ण होऊन सेवा निवृत्ती देण्यात आली त्यानिमित्त संस्थेच्या वतीने सेवा गौरव समारंभ घेऊन संस्थेचे उपाध्यक्ष अनिल नखाते व संचालक .दिलीपराव हीबारे , संचालक संजयजी बांगड , यांच्या हस्ते तायनाक नामदेव व सौ .अन्नपूर्णाताई तायनाक यांचा शाल पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य अजिंक्यभैय्या नखाते, झ दादासाहेब टेंगसे माजी शिक्षण सभापती जि प परभणी, माधवराव जोगदंड माजी सभापती कृ.उ.बा.समिती पाथरी, विद्यालयाचे मुख्याध्यापक .होगे. बी .आर. संस्थेतील सर्व कर्मचारी, सरांचे गावाकडील आप्तस्वकीय ,पाहुणे ,मित्र ,माजी विद्यार्थी व शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## झरी-जिंतूर मार्गावरील कॅनलजवळ भीषण अपघात; दोन जणांचा जागीच मृत्यू
### वेगवान वाहनाचा ताबा सुटल्याने दुर्घटना; परिसरात हळहळ व्यक्त




**(गजानन चव्हाण / दै.धर्मयोध्दा)**

**झरी -** झरी ते जिंतूर मार्गावरील कॅनलजवळ आज झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, झरी कडून जिंतूर कडे जाणारी मोटरसायकल एमएच-३८ टी २२३१ व जिंतूर कडून झरीकडे येणारी एचआर-२६ डीएफ ७८९० नंबरची कार चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने समोरासमोरील वाहनाचा अपघात होऊन दोन जण जागीच ठार झाल्याचे कळत आहे. झरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची ॲम्बुलन्स घटनास्थळी तात्काळ दाखल होऊन चालक दिनेश बिरगड यांच्यासह ग्रामस्थांनी दोघांनाही परभणी शासकीय रुणालयात नेण्यात आले. अपघात इतका भीषण होता की, त्यात दोन जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. पोलिसांनाही घटनेची माहिती देण्यात आली असून घटनेच्या स्थळी ग्रामीण पोलीस स्टेशन परभणी दाखल झालेली होती. मृतांची ओळख अद्याप पूर्णपणे पटलेली नसून, तरीपण एका जनाच्या जवळ शितल माधव व्यवहारे गाव वटकळी तालुका सेनगाव आहे अधिक मिळाले आहे नावाचे आधार कार्ड मिळाले आहे. अधिक तपास सुरू आहे. या अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. दरम्यान, या मार्गावर वारंवार अपघात होत असल्याने प्रशासनाने योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao